Code: A-M616111-M	I SEMESTER EXAM - 2025-26	4 × 55
Std.: XI	Sub: MARATHI	Marks: 50
Date:	Roll No.:__________	Time:

विभाग 1 – गद्य (गुण 12)

प्र. 1 अ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.

1) कृती करा. (1)

परीक्षा केंद्रातील काही कामे → [ ] [ ]

2) कोण ते लिहा. (1)

i) पाखरागत हालचाली करणारा – ....

ii) जुन्या काळातील शिक्षकांपैकी एक भारी माणूस – ....

''कशाला? नगं आत्ताच घेतलाय. कुठं हाय आता तुम्ही?'', मामू त्याचा चहा नाकारण्याचा प्रयत्न करतो. मनात जुन्या आठवणी रेंगाळणारा विद्यार्थी त्याचा हात खेचून त्याला आग्रहानं चहाला नेतो. मग चहा पिता पिता त्याच्या वेळच्या शिक्षकांच्या आठवणींना उजाळा मिळतो. 'एम. आर. सर भारी माणूस. केवढा आब होता त्या वक्ताला हायस्कूलचा.' मामू हरवलेल्या काळाला मुठीत पकडण्याचा प्रयत्न करतो.

ही शाळा सरकारी आहे. इथं ड्रॉईंगच्या, कॉमर्सच्या सरकारी सर्टिफिकेटच्या परीक्षांचं केंद्र आहे. या परीक्षा आल्या, की बुढा मामू पाखरागत हालचाली करू लागतो. नंबर टाकणं, बाकडी हालवून बैठकीची व्यवस्था करणं, पाणी देण्यासाठी गोरगरिबांची पोरं ऑफिसात आणून दाखल करणं. पडेल ते काम मामू उत्साहानं करू लागतो.

कधी खेळताना, कधी प्रार्थनेच्या वेळेला एखादं पोरगं चक्कर येऊन कोसळतं. रिक्षा आणून, त्यात त्या पोराल घालून डॉक्टरकडं नेताना मामू त्याला आईच्या मायेने धीर देत म्हणतो, ''घाबरू नकोस. ताठ बस. काय झालं न्हाई तुला.''

सव्वीस जानेवारी, पंधरा ऑगस्ट या राष्ट्रीय दिवशी कधी कधी मामूच्या हातानं इथला राष्ट्रध्वज, दंडावर सरसरत चढतो. शाळेच्या तिसऱ्या मजल्यावरच्या माथ्यावर निकोप वाऱ्यावर फडफडत राहतो. फेट्याजवळ हाताचा पंजा भिडवून मामू राष्ट्रगीत संपेपर्यंत ध्वजाकडं मान उंचावून बघत राहतो.

माझ्याकडं कुणी बडा पाहुणा आला, की मामूकडं बघत नुसती मान डुलवली, की तिचा इशारा पकडत मामू चहाची ऑर्डर देतो. पाहुणा बसेपर्यंत चहा दाखल होतो. ''राजे, चहा केव्हा सांगितलात?''

3) पुढील वाक्यांतून तुम्हांला समजलेले मामूचे गुण लिहा. (2)

i) मामू त्याला आईच्या मायेने धीर देत म्हणतो, ''घाबरू नकोस. ताठ बस. काय झालं न्हाई तुला.''

ii) माझ्याकडं कुणी बडा पाहुणा आला, की मामूकडा बघत नुसती मान डुलवली, की तिचा इशारा पकडत मामू चहाची ऑर्डर देतो.

4) मामूच्या संवेदनशीलतेची दोन उदाहरणे तुमच्या शब्दांत लिहा. (4)

ब) पुढील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.

1) आकृती पूर्ण करा. (2)

लेखकाच्या प्राणी अनाथलयातील प्राणी → [ ] [ ] [ ] [ ]

(P.T.O)

इतरांची प्राण्याबद्दलची मतं काहीही असली तरी आमचं हेमलकशाच वास्तव्य या प्राण्यांनी खूपच आनंदमय केल, ही गोष्ट अगदी खरी आहे. आम्ही त्या प्राण्यांसोबत आणि आमच्याकडील सर्व प्राणी एकमेकांसोबत मजेत जगत होते. आमच्याकडे माकड नि कुत्री होतीच. शिवाय नीलगाय, भेकर, अस्वल, कोल्हा, तरस, मोर, साप, नाग, खार, घोरपड असे वेगवेगळे प्राणीही होते. त्यात 1979 मध्ये एका मगरीची भर पडली, झालं असं की प्रकल्पावरचा एक जण मासे पकडायला गेला तेव्हा त्याला ही मगर सापडली. मगर म्हणजे मगरीचं दोन दिवसांचं ते छोटसं पिल्लू होतं. एखाद्या सरड्याएवढा तिचा आकार होता. मगरीच्या पिल्लाला कसं वाढवायचं, कसं खायला द्यायचं, आम्हाला याची काहीच कल्पना नव्हती. शेजारी ताडोबा अभयारण्य होत. तिथे विचारलं, पण तिथून लगेच काही कळलं नाही. शेवटी विचार केला की, मगरीला पाणी हवंच. म्हणून मग एका बॅरलमध्ये अर्थ पाणी भरल, पर मधोमध लाकूड आडवं टाकलं आणि त्यावर जाळी बसवली. हेतू हा की, जेव्हा तिला पाण्यात नकोसं वाटेल तेव्हा तिला वर चढून बसता यावं, आमच्या मनातला हेतू तिला पटला असावा. कारण गरजेप्रमाणे ती त्या जाळीवर ऊन खात बसायची. मगर काय खात असावी. याचीही आम्हाला काही कल्पना नव्हती. पण अंदाजाने रात्री पंधरा बेडूक तिच्या पाण्यात सोडले. सझाळी पाहिलं तर त्यातले दहाच शिल्लक होते. त्यावरून 'मगर बेडूक खाते' हा शोध आम्हाला लागला, लहान मासे पाण्यात टाकले तरा बेडूकच पसंत करी. मग मी आणि विलास रोज रात्री बेडूक पकडायला जायचो. तिला हवं ते खाणं तर द्यायला हवं, कारण ती आमची पाहुणी होती.

– प्रकाशवाटा: लेखक डॉ. प्रकाश आमटे

2) मगरीच्या पिल्लाच्या खण्याचा बंदोबस्त लेखकाने कसा केला ? (2)

विभाग 2 –पद्य (गुण 08)

प्र. 2 **पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.**

1) **योग्य पर्याय निवडून वाक्ये पूर्ण करा.** (2)

i) तो फाया कानी ठेवू म्हणजे –
- अ) सुगंधी वृत्ती जोपासू.
- ब) अत्तराचा स्प्रे मारू.
- क) कानात अत्तर ठेवू.

ii) पोपटी स्पंदनासाठी म्हणजे –
- अ) पोपटी पानात जाण्यासाठी.
- ब) उत्साहाने सळसळण्यासाठी .
- क) पानांचे विचार घेण्यासाठी.

झाडांच्या मनात जाऊ, पानांचे विचार होऊ
पोपटी स्पंदनासाठी, कोकीळ होऊनी गाऊ...

बहरात वसंतामधल्या, तो सूर सावळा ऐकत
जातील फुलेही रंगून, जन्माला अत्तर घालत
चल सुराबरोबर आपण, तो फाया कानी ठेवू...

खेळून रंगपंचमी, फुलपाखरे भिजली सारी
हा थवा असे रंगीत की पताकाच फिरणारी
हे भिरभिरणारे तोरण दाराला आणून लावू...
ही कोणाची रे करणी डोळ्यांत झऱ्याचे पाणी
हे उधाण आनंदाचे की देवाघरची गाणी
गाण्यात ऋतूच्या आपण चल खळाळून रे वाहू...

2) **पुढील कृतींतून मिळणारा संदेश कवितेच्या आधारे लिहा.** (2)

निसर्गातील घटकांच्या सोबतीने केलेली कृती	संदेश
i) कोकीळ होऊनी गाऊ	....
ii) गाण्यात ऋतूच्या आपण चल खळाळून रे वाहू	....

3) 'डोळ्यांत झऱ्याचे पाणी' या शब्दसमूहातील भावसौंदर्य उलगडून लिहा. (4)

विभाग 3 – साहित्यप्रकार (नाटक)(गुण 06)

प्र. 3 **पुढील उताऱ्याच्या आधी दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.**

1) **कृती सोडवा.** (2)



2) **उत्तरे लिहा.** (2)

i) प्रायोगिक नाटकात काय अपेक्षित असते ?

ii) प्रायोगिक नाटकाचा मुख्य हेतू क़ाय असतो ?

जागतिकीकरणाच्या रेट्यात काळ बदलला. प्रसारमाध्यमांचा पगडा वाढला. फुरसतीचा वेळ कमी झाला. करमणुकीचे अनेक पर्याय उपलब्ध झाले. आर्थिकदृष्ट्या या नाटकांचे प्रयोग करणे तुलनेने खर्चीक झाले. त्याचे तिकिटाचे दरही सर्वसामान्य लोकांना परवडेनासे झाले. या व यांसारख्या अनेक कारणांमुळे संगीत नाटक मागे पडत गेले व प्रायोगिक आणि व्यावसायिक नाटकांची सुरुवात झाली. प्रायोगिक नाटकाचा मुख्य हेतू नाटकाचा विषय आणि सादरीकरण यात प्रयोग करणे हा असतो. प्रायोगिक नाटकेही व्यावसायिकरीत्या केली जाऊ शकतात. मनाशी काही हेतू धरून आशयात व अभिव्यक्तीत जाणीवपूर्वक प्रयोग करत राहणे प्रायोगिक नाटकात अपेक्षित असते. नाट्यवाङ्मयात 1960 नंतर प्रायोगिकता आली असे मानले जाते.

प्रायोगिक नाटकाचेस्वरूप व वैशिष्ट्ये

(1) नाटकाची विशिष्ट चौकट मोडण्याचा प्रयत्न प्रायोगिक नाटकात केला जातो.

(2) आकृतिबंधात नावीन्य असते.

(3) आशय/अभिव्यक्तीत स्वातंत्र्य घेतले जाते.

(4) स्थळ, काळ, रचना, नेपथ्य, अभिनय, तंत्र यांत जाणीवपूर्वक बदल घडवलेला असतो.

(5) नाट्यबीज, नाट्यविषय, आशय व रचना तसेच नाट्यप्रयोग, नेपथ्य यांमध्ये पारंपरिक नाटकापेक्षा काहीसे वेगळेपण,प्रायोगिक नाटकात जाणवते.

(6) प्रायोगिक नाटकात प्रतीकात्मकता, अपरिचित सूचकता यांचा खुबीने वापर केलेला आढळून येतो.

(7) भाषिक प्रयोग केले जातात. घटना सहज व नैसर्गिक राखण्याचा प्रयत्न केला जातो.

(8) या नाटकांमधील संवादाची भाषा बरेचदा बोलीभाषेसारखी असते.

(9) प्रायोगिक नाटकात आशयानुरूप येणाऱ्या प्रसंगांवर भर दिलेला असतो.

(10) प्रायोगिक नाटकात 'आपल्याला वाटणारे आपल्या पद्धतीने' मांडायचे धाडस असते.

'रिंगणनाट्य' (लेखक व दिग्दर्शक– अतुल पेठे, राजू इनामदार) हे प्रायोगिक नाटकाचे अलीकडच्या काळातील ठळक उदाहरण देता येईल.

3) प्रयोगित नाटकाचे स्वरूप व वैशिष्टये स्पष्ट करा. (2)

किंवा

'नाटक हा वाङ्मयप्रकार इतर वाङ्मय प्रकारांपेक्षा वेगळा आहे' हे विधान स्पष्ट करा.

विभाग 4 – उपयोजित लेखन (गुण 12)

प्र. 4 पुढील कृती करा.

1) मुद्रित शोधकाच्या भूमिकेचे आजच्या काळातील महत्त्व तुमच्या शब्दांत लिहा. (3)

2) 'सूत्रसंचालकाने व्यवस्थित पूर्वतयारी केली. तरच सूत्रसंचालन उत्तम होऊ शकते,' या विधानाची सत्यता पटवून लिहा. (3)

3) उत्तम सूत्रसंचालनासाठी आवश्यक असलेली कौशल्ये स्पष्ट करा. (3)

4) खालील खुणांचा अर्थ स्पष्ट करा. (3)

क्र.	खूण	खुणेचा अर्थ
1)	⊙	
2)	(/)	
3)		
4)	?	
5)		
6)	Bold	

विभाग 5 – व्याकरण (गुण 12)

प्र. 5 खालील दिलेल्य सूचनेनुसार कृती सोडवा.

1) शब्दशक्तीनुसार तक्ता पूर्ण करा. (3)

अ.क्र.	शब्दशक्ती	शब्द	वाक्य
1)	....	सिंह	....
2)	लक्षणा	....	....
3)	....	....	पांढरे ते सारेच बगळे नसतात.

2) पुढील उदाहरणे वाचून त्यातून व्यक्तीचा कोणता गुण दिसतो ते लिहा. (3)

	वाक्ये	गुण
1)	शरण आलेल्या माणसांवर दया करावी.	
2)	भीम हा महापराक्रमी योद्धा होता.	
3)	परोपकार करणे हे पुण्यकर्म आहे.	

3) सूचनांनुसार वाक्यसंश्लेषण करा. (3)

1) आई म्हणाली. मोड आलेल्या धान्यात खूप प्रथिने असतात. (मिश्रवाक्य करा.)

2) नाटकाची तिसरी घंटा वाजली. नाटकाला सुरूवात झाली. (संयुक्त वाक्य करा.)

3) आजी गुळगुळीत रस्त्यावरून चालत होती. तिचा पाय घसरला. ती पडली. (केवल वाक्य करा.)

4) खालील कृती सोडवा व काळाचे नाव लिहा. (कंसातील क्रियापदांचे योग्य रूप वापरा.) (3)

1) काल रात्री सारखा विजांचा गडगडाट .... (होणे)

2) उदया मी ही मालिका पुन्हा .... (बघणे)

3) समीर पुस्तक वाचत .... (असणे)